महाराष्ट्र शासन
**महाराष्ट्र लोकसेवा आयोग**

मुख्य कार्यालय : ५, ७, ८ वा मजला, कुपरेज टेलिफोन निगम इमारत, महर्षि कर्वे मार्ग, कुपरेज, मुंबई - ४०००२१ ☎२२७९५९००
फोर्ट कार्यालय : बँक ऑफ इंडिया इमारत, ३ रा मजला, फोर्ट, मुंबई-४००००१ ☎२२१०२२२२
Email ID : contact-secretary@mpsc.gov.in Website : https://mpsc.gov.in , https://mpsconline.gov.in

क्रमांक : एमआयएस-०१२२/प्र.क्र.२०/२०२२/३१ दिनांक – ०३ एप्रिल, २०२३

**- : प्रसिद्धीपत्रक:-**

**विषय :-** लिपिक टंकलेखक व कर सहायक या संवर्गांच्या टंकलेखन कौशल्य चाचणीच्या मॉक लिंकबाबत.
**संदर्भ:-** आयोगाचे समक्रमांकाचे दिनांक ३१ मार्च, २०२३ रोजीचे प्रसिध्दीपत्रक.

महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या दिनांक २३ मार्च, २०२३ रोजीच्या प्रसिध्दीपत्रकानुसार महाराष्ट्र गट-क सेवा मुख्य परीक्षा-२०२१ मधील लिपिक टंकलेखक व कर सहायक या संवर्गाकरीता टंकलेखन कौशल्य चाचणीसाठी मॉक लिंक उपलब्ध करून देण्याबाबत घोषणा करण्यात आली होती. त्याअनुषंगाने संदर्भाधीन प्रसिध्दीपत्रकानुसार मॉक लिंक उपलब्ध करून देण्यात आली आहे.

**२.** प्रस्तुत मॉक लिंक मधील मराठी टंकलेखनाच्या Keyboard Layout बाबत काही उमेदवारांमध्ये संभ्रम निर्माण झाला असल्याचे निदर्शनास आले आहे. सदर मॉक लिंक टेस्ट मधील मराठी टंकलेखनाचा Keyboard Layout हा केवळ उमेदवारांना टंकलेखन कौशल्य चाचणीची कार्यपध्दती व स्वरुप अवगत व्हावे याकरीता अतिरिक्त सुविधेच्या स्वरुपात उपलब्ध करून देण्यात आला आहे. उमेदवारांनी संगणकीय प्रणालीवर आधारित मराठी टंकलेखन चाचणीचा सराव हा ISM V6 प्रणालीवरील Remington Marathi Keyboard Layout वरच करावा, कारण प्रत्यक्ष टंकलेखन चाचणीकरीता उमेदवारांना ISM V6 प्रणालीवरील Remington Marathi Keyboard Layout हाच पर्याय उपलब्ध करून देण्यात येणार आहे.

**३.** उमेदवारांच्या माहितीकरीता प्रत्यक्ष परीक्षेच्या वेळी उपलब्ध करून देण्यात आलेला ISM V6 प्रणालीवरील Remington Marathi Keyboard Layout सोबतच्या **परिशिष्ट-अ** मध्ये चित्रात्मक स्वरुपात दर्शविण्यात आलेला आहे.

**४.** टंकलेखन कौशल्य चाचणी अर्हताकारी स्वरुपाची असून, चाचणीचा तपशील खालीलप्रमाणे राहील :-

**४.१ मराठी टंकलेखन :-**

(१) अमागास उमेदवारांसाठी – ३०० (साधारणपणे १५०० Key Depression) शब्दांपैकी किमान २७९ किंवा त्यापेक्षा जास्त अचूक शब्द टंकलिखित करणे.

(२) अमागास वगळता इतर सर्व पात्र आरक्षित उमेदवारांसाठी - ३०० शब्दांपैकी किमान २७० किंवा त्यापेक्षा जास्त अचुक शब्द टंकलिखित करणे.

**४.२ इंग्रजी टंकलेखन :-**

(१) अमागास उमेदवारांसाठी – ४०० (साधारणपणे २००० Key Depression) शब्दांपैकी किमान ३७२ किंवा त्यापेक्षा जास्त अचूक शब्द टंकलिखित करणे.

(२) अमागास वगळता इतर सर्व पात्र आरक्षित उमेदवारांसाठी - ४०० शब्दांपैकी किमान ३६० किंवा त्यापेक्षा जास्त अचुक शब्द टंकलिखित करणे.

**५.** शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक: अपंग-२०१६/प्र.क्र.११६/१६-अ, दिनांक १६ नोव्हेंबर, २०१६ तसेच शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक: संकिर्ण-२०१८/प्र.क्र.१८०/२८, दिनांक १३ जुन, २०१९ नुसार अनुक्रमे पात्र दिव्यांग व माजी सैनिक उमेदवारांना टंकलेखन अर्हता चाचणी अनिवार्य नाही.

ठिकाण : मुंबई

सह सचिव,
दक्षता, धोरण व संशोधन,
महाराष्ट्र लोकसेवा आयोग

# परिशिष्ठ – अ

प्रत्यक्ष टंकलेखन चाचणीवेळी उमेदवारांना उपलब्ध करून देण्यात आलेला ISM V6 प्रणालीवरील Remington Marathi Keyboard Layout :-

